**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे- 410 505

अर्थशास्त्र विभाग

(शैक्षणिक वर्ष 2021 - 2022 पासून)

वर्ग:- :- तृतीय वर्ष कला शाखा (T.Y.B.A.) CC-IE (3)

विषय:- (भारतीय आर्थिक विकास-I)

Indian Economic Development-I

सेमिस्टर :- V

मार्गदर्शक प्राध्यापक

डॉ. उमेश भोकसे

# 2. विकसित आणि विकसनशील देश

2.1 विकसित आणि विकसनशील देशाची संकल्पना

2.2 विकसित देशाची वैशिष्ट्ये

2.3 विकसनशील देशांची वैशिष्ट्ये

2.4 भारत एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था

प्रास्ताविक :

जगातील देशांची स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, औद्योगिकीकरण, राहणीमान यासारख्या आर्थिक स्थितीच्या आधारे स्थूलमानाने विकसित देश आणि विकसनशील देश अशा दोन प्रकारात विभागणी केली जाते. विकसित देश हे प्रगत देश म्हणून ओळखले जातात. कमी दरडोई उत्पन्नासह औद्योगिक विकासाच्या सुरुवातीच्या पातळीवर असणारे देश विकसनशील देश किंवा अल्पविकसित देश म्हणून ओळखले जातात. विकसनशील देशातील आर्थिक स्थिती ही विकसित देशातील स्थितीप्रमाणे समाधानकारक नाही. विकसनशील देशात तंत्रज्ञानविषयक प्रगती मर्यादित आहे. तसेच सामाजिक व राजकीय स्थिती विकासाला मर्यादा आणणारी आहे.

या प्रकरणांमध्ये विकसित व विकसनशील देशाची संकल्पना, विकसित देशाची वैशिष्ट्ये आणि विकसनशील देशांची आर्थिक, लोकसंख्याविषयक, तंत्रज्ञानविषयक, सामाजिक व राजकीय वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

2.1 विकसित आणि विकसनशील देशाची संकल्पना :

जगातील देशाची विभागणी विकसित देश आणि विकसनशील देश अशा दोन प्रमुख विभागांमध्ये केली जाते. देशांचे वर्गीकरण स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, औद्योगिकीकरण, राहणीमान यासारखे आर्थिक स्थितीच्या आधारे केले जाते. इतर देशांच्या तुलनेत ज्यांच्या अर्थव्यवस्थेने उच्च प्रगती केली आहे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानविषयक सुविधा उपलब्ध आहे अशा सर्वोच्च देशांना विकसित देश म्हणतात. मानवी विकास निर्देशांक (HDI) आकडेवारी देशांची विकासाच्या आधारावर क्रमवारी लावते. उच्च दर्जाचे जीवनमान, उच्च स्थूल देशांतर्गत उत्पादन, उच्च बालकल्याण, उत्कृष्ट आरोग्य सेवा, वाहतूक, दळणवळण व शैक्षणिक सुविधा, उत्तम गृहनिर्माण व राहणीमान, औद्योगिक, पायाभूत व तंत्रज्ञानातील प्रगती, उच्च दरडोई उत्पन्न आणि चांगले आयुर्मान असलेली देश विकसित देश म्हणून ओळखले जातात. विकसित देश हे असे देश आहेत जे अर्थव्यवस्था व औद्योगीकरणाच्या दृष्टीने विकसित आहेत. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, नॉर्वे, स्वीडन, स्वित्झर्लंड, युनायटेड स्टेट्स ही विकसित देशांची नावे आहेत.

कमी दरडोई उत्पन्नासह औद्योगिक विकासाच्या सुरुवातीच्या पातळीवर असणारे देश व विकसनशील देश म्हणून ओळखले जातात. ते अल्पविकसित देश म्हणून देखील ओळखले जातात. अशा देशात निकृष्ट पायाभूत सुविधा, अल्प वृद्धीदर, असंतुलित अर्थव्यवस्था आणि अत्यंत कमी वैयक्तीक उत्पन्न असते. या देशांमध्ये कृषी आणि खनिज किंवा स्रोतांपासूनच्या  उत्पादनावर प्रचंड अवलंबुन राहण्यापासून वाचण्यासाठी आवश्यक कौशल्य आणि संसाधनांचा अभाव असतो.

विकसनशील देश हे देशभरातील उद्योग स्थापनेत विकसित देशावर अवलंबून असतात. अशा देशाचा मानव विकास निर्देशांक अल्प असतो. अशा देशात स्थूल देशांतर्गत उत्पादन कमी असते. निरक्षरता दर उच्च असतो. दर्जेदार शैक्षणिक, वाहतूक, दळणवळण आणि वैद्यकीय सुविधांची कमतरता असते. उत्पन्नाचे वितरण असमान असते. मृत्यूदर आणि जन्मदर जास्त असतो. बेकारी व दारिद्र्य यांचे प्रमाण जास्त असते. भारत, श्रीलंका, पाकिस्तान, केनिया, थायलंड ही विकसनशील देशांची  नावे आहेत.

प्रा. रॅग्नर नर्क्स यांच्या मते, "विकसनशील किंवा अल्पविकसित देश हे प्रगत देशांची तुलना करता त्यांची लोकसंख्या व नैसर्गिक संसाधनांच्या संदर्भात भांडवलाने कमी सुसज्ज असलेले देश आहेत. सायमन कुझनेट्सच्या मते, 'अल्पविकसित किंवा विकसनशील देश म्हणजे असे देश की जे आधुनिक भौतिक व सामाजिक तंत्रज्ञानाद्वारे मिळणाऱ्या संधीचा उपयोग करण्यास असमर्थ आहेत आणि त्यांच्या लोकसंख्येच्या किमान निर्वाह व भौतिक सुविधा पुरविण्यात अपयशी ठरले आहेत.'

2.2 विकसित देशांची वैशिष्ट्ये :

1. उच्च दरडोई उत्पन्न :

उच्च दरडोई उत्पन्न हे विकसित देशांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अल्पविकसित देशांच्या तुलनेत अशा देशातील दरडोई उत्पन्न जास्त असते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न समजते. विकसित देशात राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण मोठे असते आणि लोकसंख्येचे प्रमाण कमी असते. तसेच लोकसंख्या वाढीचा वेग कमी असतो. त्यामुळे दरडोई उत्पन्न अधिक असते. 2019 मध्ये विकसित देशातील दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNI Per capita) नॉर्वे (66,494 डॉलर), स्वित्झलँड (69,394 डॉलर), जर्मनी (55,314 डॉलर), यु. एस. (63,826 डॉलर), भारत (6,681 डॉलर), पाकिस्तान (5,005 डॉलर), बांगलादेश (4,976 डॉलर) अशा अल्पविकसित देशात देशांच्या तुलनेत फारच जास्त होते.

2. भांडवल निर्मितीचे प्रमाण अधिक :

विकसित देशात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण मोठे असते. त्यामुळे अशा देशात बचतीचे प्रमाणही अधिक असते. भांडवलाची उपलब्धता अधिक असते. गुंतवणूकीचे प्रमाण मोठे असते. त्यामुळे भांडवल निर्मितीचा वेग अधिक असतो.

3. तंत्रज्ञानविषयक प्रगती :

विकसित देशात तंत्रज्ञानविषय प्रगती अधिक असते. तंत्रज्ञान विकासासाठी अशा देशात संशोधन व विकास कार्यावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. तंत्रज्ञानविषयक प्रगती मोठ्या प्रमाणात असल्याने शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे या क्षेत्रातील उत्पादकता जास्त असते.

4. औद्योगिकीकरण :

विकसित देशात औद्योगिक प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली असते. उद्योगांचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला असल्याने राष्ट्रीय उत्पन्नात व रोजगारात औद्योगिक क्षेत्राचा वाटा मोठा असतो. अशा देशात आधुनिक उद्योगांची मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली असते.

5. नागरिकीकरण :-

विकसित देशात उद्योगांची प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली असल्याने शहरांची वाढ अधिक असते. तसेच शेतीच्या तुलनेत औद्योगिक व सेवाक्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण अधिक असल्याने शहरात राहणारे लोकसंख्येचे प्रमाण मोठे असते.

6. वित्तीय संस्थांची प्रगती आधिक :-

विकसीत देशात बँक आणि इतर वित्तीय संस्थांची प्रगती मोठ्या प्रमाणावर झालेली असते. त्यामुळे देशातील विविध आर्थिक क्षेत्रांना कमी व्याजदराने आवश्यक असलेला वित्तपुरवठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतो.

7. पायाभूत सुविधांचा विकास :-

विकसित देशात रस्ते, वाहतूक, दळणवळण, वीजनिर्मिती अशा पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला असतो. त्यामुळे शेती, उद्योग वगैरे क्षेत्राच्या वाढीचा वेग अधिक राहून सातत्यपूर्ण रीतीने आर्थिक वृद्धी घडून येते.

8. प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व कमी :-

विकसित देशात औद्योगिक व सेवा क्षेत्राची प्रगती मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे देशातील राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार, निर्यात यात औद्योगिक व सेवा क्षेत्राचा वाटा अधिक असतो. शेती व संलग्न क्षेत्रावरील अवलंबित्व कमी असते.

9. उच्च राहणीमानाची पातळी :-

उच्च राहणीमानाची पातळी हे विकसित देशाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. अशा देशात जीवनावश्यक वस्तूंची दरडोई उपलब्धता अधिक असते. अशा देशात उत्पन्नाची पातळी उच्च असते. त्यामुळे लोकांना आपल्या गरजा अधिकाधिक प्रमाणात पूर्ण करता येतात. अधिकाधिक लोकसंख्येत चांगला आहार आणि आरोग्य शिक्षणाच्या सुविधा मिळतात.

10. उच्च मानव विकास :-

उच्च मानव विकास हे विकसित देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. विकसित देशाचा मानव विकास निर्देशांक उच्च असतो. याचे कारण देशात देशात राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण मोठे असते. शिक्षणाच्या सुविधा प्रगत असतात. आरोग्य सुविधांचा विकास अधिक असतो. अशा देशात उच्च दरडोई उत्पन्न, उच्च आयुमर्यादा आणि साक्षरतेचे प्रमाण मोठे असते. अशा देशात मानवी साधनसामग्रीची गुणवत्ता अधिक असते.

विकसनशील देशांची वैशिष्ट्ये :-

विकसनशील देशांची आर्थिक लोकसंख्याविषयक, तंत्रज्ञानविषयक, सामाजिक आणि राजकीय वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे: विकसनशील देशात अलीकडील काळात विकास घडून येत आहे. मात्र, विकसित देशांच्या तुलनेत या देशातील विकास मर्यादित आहे. विकसनशील देशांची आर्थिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

1. अल्प दरडोई उत्पन्न :-

अल्प दरडोई उत्पन्न हे विकसनशील देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा देशात राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याने दरडोई उत्पन्न कमी असते. विकसित देशांची तुलना करता विकसनशील देशातील लोक दरडोई उत्पन्न फारच कमी आहे. दरडोई उत्पन्न कमी असल्याने अशा देशात दारिद्याचे प्रमाण अधिक आहे. 2019 मध्ये भारत (6,681 डॉलर), पाकिस्तान (5,005 डॉलर), बांगलादेश (4,976 डॉलर) अशा विकसनशील देशातील दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNI per capita) नॉर्वे (66,494 डॉलर) स्वित्झर्लंड (69,394 डॉलर), जर्मनी (55,314 डॉलर) यु.एस.ए. (63,826 डॉलर) विकसित देशांच्या तुलनेत फारच कमी आहे. स्वित्झर्लंडचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न भारताच्या दहा पटीने जास्त तर यु. एस. ए. चे नऊ पटीपेक्षा जास्त आहे. विकसनशील देशातील दरडोई उत्पन्न कमी आहे पण त्याचबरोबर उत्पन्नाच्या वाटणीत विषमता आहे.

2. भांडवलाची कमतरता :-

भांडवलाची कमतरता हे विकसनशील देशांच्या बाबतीत आढळून येणारे वैशिष्ट्य आहे. भांडवलाची कमतरता हे अशा देशांच्या अल्पविकासाचे कारण आहे. असेच तो अल्प विकासाचा परिणाम आहे. भांडवलाच्या कमतरतेमुळे शेती, उद्योग, सेवा इत्यादींची प्रगती मर्यादित राहून राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नाची पातळी अल्प आहे. विकसनशील देशात लोकसंख्यावाढीमुळे बचत व गुंतवणुकीचा दर कमी आहे. विकसित देशांप्रमाणे विकसनशील देशात भांडवल बाजार विकसीत नाही.

3. विकसनशील नैसर्गिक साधनसामग्री:

विकसनशील देशात नैसर्गिक साधनसामग्री वापरली जात नाही किंवा वापरली जात असेल तर पूर्णपणे वापरली जात नाही. नैसर्गिक साधनसामग्रीचा अल्प वापर हे अशा देशाचे एक वैशिष्ट्य होय. विकसनशील देशात जमीन, पाणी, खनिजे, जंगले व ऊर्जा साधनसामग्री यांची उपलब्धता कमी नसते. मात्र, अनेक अडथळे व समस्या यामुळे अशा नैसर्गिक साधनसामग्रीचा पुरेपूर वापर केला जात नाही. प्रा. के. के. कुरीहारा यांच्या मते, प्रचंड

प्रमाणात नैसर्गिक साधनसामग्री असलेले; मात्र त्या साधनसामग्रीच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या तंत्रज्ञानाचा व भांडवलाचा अभाव असलेले देश हे ज्या देशांकडे साधनसामग्री उपलब्ध नाही, अशा देशांइतकेच गरीब असतात. अशा प्रकारे विकसनशील देशात भांडवलाची टंचाई असते असे म्हणण्यापेक्षा असे देश उत्पादनाची पद्धती, सामाजिक व आर्थिक संघटना यात योग्य तो बदल करून नैसर्गिक साधनसामग्रीची कमतरता दूर करण्यात यशस्वी झाले नाहीत असे म्हणणे जास्त सयुक्तिक ठरेल.

4. शेतीवरील मोठ्या प्रमाणात अवलंबित्व :-

जगातील बहुतांशी विकसनशील देशात शेती क्षेत्राचे वर्चस्व असलेले दिसते. अशा देशात कच्चामाल किंवा प्राथमिक वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जाते. अशा देशात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्पादन व रोजगारनिर्मिती होते. कारखानदारी क्षेत्राचा उत्पादन व रोजगार यातील वाटा कमी असतो. विकसनशील देशात 50 ते 60 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शेती व्यवसायात असते. याचे कारण भांडवलाच्या कमतरतेमुळे अशा देशात द्वितीय व तृतीय क्षेत्राचा विकास मर्यादित प्रमाणात झालेला असतो. शेती क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात असलेले लोकसंख्येचे अवलंबित्व हे अविकसितपणाचे लक्षण होय. अशा देशात धारण क्षेत्राचा आकार लहान आहे व हे त्या देशातील शेतीची उत्पादकता कमी असण्याचं कारण आहे.

5. बेकारीचे मोठे प्रमाण :

विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात उघड व छुपी किंवा प्रच्छन बेकारी आढळून येते. शहरीकरण व शिक्षणप्रसार या बरोबरच अशा देशात बेरोजगारीत वाढ होत आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर श्रम दलात वाढ होत आहे. मात्र, विकसनशील देशात औद्योगिक क्षेत्राची प्रगती मर्यादित असल्याने हे क्षेत्र मोठ्या प्रमाणावरील श्रम दलास सामावून घेऊ शकत नाही. विकसनशील देशात सुशिक्षितांमधील बेकारीचे प्रमाणही मोठे आहे. प्रच्छन्न आणि छुपी बेकारी हे अल्पविकसित देशाचे महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. ही बेकारी अनिश्चित असते. अशी बेकारी ग्रामीण भागातील भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असते. प्रच्छन किंवा छुपी बेकारी किती प्रमाणात आहे, याविषयी नेमकेपणाने अंदाज केलेला उपलब्ध नाही. मात्र, हे प्रमाण 5 टक्क्यांपेक्षा जास्त नाही असे मानले जाते.

6. आर्थिक मागासलेपणा :

आर्थिक मागासलेपणा हे विकसनशील देशाचे महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. अनेक गोष्टीतून हा मागासलेपणा दिसून येतो. अल्पविकसित देशात श्रमाची कार्यक्षमता कमी होते. उत्पादन घटकांची गतिशीलता मर्यादित असते. व्यवसाय व व्यापार यात विशेषीकरण कमी प्रमाणात

असते. विकसनशील देशातील आर्थिक मागासलेपणाचा मूलभूत कारण विकसित देशांच्या तुलनेत अशा देशात असलेली श्रमाची अल्प उत्पादकता हे होय. विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात दारिद्य असल्याने श्रमाची कार्यक्षमता कमी असते.

संयुक्त कुटुंब पद्धती व जातीव्यवस्था यामुळे श्रमाच्या बाबतीत व्यवसायिक गतिशीलता मर्यादित असते. अशा देशात दारिद्रय मोठ्या प्रमाणात असते. मात्र, ते दैवामुळे आलेल्या आहे अशी लोकांची भावना असते. बालकामगारांचे अस्तित्व अशा देशात असते. तसेच स्त्रिया, बाल कामगार यांचे पुरुषांच्या तुलनेत समाजात निकृष्ट दर्जा असतो. श्रमाला प्रतिष्ठा नसते.

7. परकीय व्यापारभिमुख :

विकसनशील देशांची काळजीपूर्वक माहिती घेतली असता असे देश परकीय व्यापारभिमुख असल्याचे लक्षात येते. असे देश काही थोड्या प्राथमिक वस्तूंचे उत्पादन करतात व त्यांची निर्यात करतात आणि उपभोग्य वस्तू व यंत्रसामग्रीची आयात करतात. काही देशांच्या बाबतीत आयातीचे एकूण उत्पादनाशी असलेले गुणोत्तर फारच मोठे असते. तर काही देशांच्या बाबतीत एखाद्या दुसऱ्या वस्तूंची निर्यात हा परकीय चलन मिळवण्याचा एकमेव स्रोत आहे.

विकसनशील देशांचे आयातीवर असलेल्या मोठ्या प्रमाणावरील अवलंबित्वामुळे अशा देशांच्या अर्थव्यवस्थेवर व्यापारचक्रामुळे परिणाम होतो. निर्यात वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय किमतीतील चढ-उतारांचा अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होतो. विदेशात आलेल्या मंदीमुळे त्यांच्या उत्पादनांची मागणी कमी होते. त्यामुळे किमतीत मोठ्या प्रमाणात घसरण होऊन तोटा सहन करावा लागतो. परकीय व्यापारभिमुखतेमुळे गरीब देशात परकीय भांडवल येते. परकीय भांडवलाचे दुष्परिणाम अशा देशांच्या बाबतीत दिसून येतात.

8. निकृष्ट आर्थिक संघटन :

विकसनशील देशांच्या आर्थिक विकासात आर्थिक संघटन महत्त्वाची भूमिका बजावते. अप्रत्यक्ष कर व उत्पादन शुल्क यापासून अशा देशात मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. अशा देशात मोठ्या प्रमाणात प्रतिगामी स्वरूपाचे कर आकारले जातात. ग्रामीण भागात बँका व इतर वित्तीय संस्था मर्यादित असतात. हुंडी बाजार व नाणेबाजार हे असंघटित असतात. नाणेबाजाराच्या वेगवेगळ्या भागात समन्वयाचा अभाव असतो आणि व्याजदरात मोठ्या प्रमाणात तफावत आढळते. अकार्यक्षम व कुशल प्रशासन व्यवस्था दिसून येते.

9. घटक असमतोल :

विकसनशील अर्थव्यवस्थांचे घटक असमतोल हेही एक वैशिष्ट्य आहे. ते असे स्पष्ट करते की, गरीब देशातील उत्पादन घटक समतोल पातळी साध्य करू शकत नाहीत. अल्पविकसित देशात घटकांची अचलता फार मोठ्या प्रमाणात असते. श्रम हा घटक अशा प्रकारे अचल असतो की, जेथे श्रमाची उत्पादकता शून्य आहे अशा कार्यातही श्रमिक कार्यरत असतात. विशिष्ट सामाजिक संस्था, भाषेतील फरक, धर्म व चालीरीती यासारख्या कारणांमुळे घटकांची गतिशीलता कमी होते. विकसनशील देशात बचतीची गतिशीलता मर्यादित असते. लोक आपली संपत्ती सोने, दागिने आणि रोख स्वरूपात धारण करतात. त्यामुळे गुंतवणुकीसाठी आवश्यक असलेला निधी बचतीच्या माध्यमातून उपलब्ध होत नाही.

10. पत व विक्रीविषयक मर्यादित सुविधा :

अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग अशा आर्थिक क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने कार्यक्षम पतव्यवस्था व विक्रीव्यवस्था आवश्यक असते. विकसनशील देशाचे पतविषयक आणि विक्रीव्यवस्थेविषयक मर्यादित सुविधा हे एक वैशिष्ट्य असल्याचे प्रा. हार्वे यांनी मांडले आहे. पतविषयक सुविधा मर्यादित असल्याने अशा देशात शेती, उद्योग, व्यापार अशा क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे या क्षेत्रात आवश्यक ती गुंतवणूक होत नाही. शेती विकासाच्या दृष्टीने कार्यक्षम विक्रीव्यवस्था महत्वाची असते. मात्र, विकसनशील देशात विक्रीव्यवस्थेच्या बाबतीत अनेक उणिवा दिसून येतात. विशेषतः हा शेतमाल विक्रीव्यवस्थेच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात उणिवा आढळून येतात. त्यामुळे शेतमालाला योग्य भाव न मिळवून शेती विकासात अडथळा येतो. अशा प्रकारे पत वक्रीव्यवस्थेच्या मर्यादित सुविधांमुळे अल्पविकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळा आलेला आहे.

2.3.2 विकसनशील देशाची लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये:

जगातील एकूण लोकसंख्येपैकी फार मोठी लोकसंख्या विकसनशील देशात आहे. विकसनशील देशात अलीकडील काळात लोकसंख्येची गुणवत्ता वाढत आहे. मात्र, विकसित देशांच्या तुलनेत या देशातील लोकसंख्याविषयक प्रगती मर्यादित आहे. विकसनशील देशांची लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1. उच्च लोकसंख्या वृद्धी दर :

उच्च लोकसंख्या वृद्धी दर किंवा लोकसंख्येचा मोठा आकार हे विकसनशील देशांचे एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. अलीकडील काळातील विकसनशील देशातील लोकसंख्यावाढीस किंवा लोकसंख्येच्या मोठ्या आकाराच्या ह्या देशातील उच्च जनन दर आणि सुधारित आरोग्य सेवांमुळे घडलेला मृत्यू दर कारणीभूत आहे.

जगाची लोकसंख्या 2014 मध्ये 729.5 कोटी होती त्यात वाढ होऊन ती 2019 मध्ये 771.3 कोटी झाली. याच काळात विकसनशील देशातील लोकसंख्येत 594.4 कोटीवरून 633.8 कोटी पर्यंत आणि विकसित देशातील लोकसंख्येत 104.6 कोटीवरून 106.5 कोटीपर्यंत वाढ झाली. 2019 मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येत विकसनशील देशातील लोकसंख्येचे प्रमाण 82.2 टक्के एवढे मोठे होते.

लोकसंख्येचा वार्षिक वृद्धी दर 2013-19 या काळात जग 1.1 टक्के, विकसनशील देश 1.3 टक्के आणि विकसित देश 0.4 टक्के असा होता. याचा अर्थ विकसनशील देशातील लोकसंख्या वृद्धी दर विकसित देश आणि जगातील वृद्धी दरापेक्षा जास्त होता.

2. उच्च जननदर आणि घटता मृत्युदर :

उच्च जननदर आणि घटता मृत्युदर हे विकसनशील देशातील लोकसंख्याविषयक वैशिष्ट आहे. विकसित देशाच्या तुलनेत विकसनशील देशातील जन्मदराचे प्रमाण खूप मोठे आहे. यास विवाहाची सार्वत्रिकता, दारिद्र्याचे मोठे प्रमाण, एकत्र कुटुंब पद्धती, निरक्षरतेचे मोठे प्रमाण, परिणामकारक लोकसंख्या नियंत्रणाचा अभाव, रूढी, परंपरा, धर्म व अंधश्रद्धा यांचा पगडा इत्यादी कारणे जबाबदार आहेत. विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशात मृत्युदर अधिक आहे. मात्र, तो घटता आहे. विकसनशील देशात मृत्यू दारात वेगाने घट होण्यास आरोग्यविषयक सुविधेत वाढ, दुष्काळी परिस्थितीवर नियंत्रण, पूरनियंत्रण, साथीच्या रोगावर नियंत्रण, वाहतूक व दळणवळण साधनांची प्रगती अशी कारणे जबाबदार आहेत.

3. बाल मृत्यू दर जास्त:

विकसनशील देशात बालमृत्यूचे प्रमाण विकसित देशाच्या तुलनेत जास्त आहे. बालमृत्यू दराच्या एकूण लोकसंख्येच्या वृद्धी दरावर आणि लोकसंख्येच्या वयाच्या रचनेवर प्रभाव पडतो. अशा देशात वैद्यकीय सेवांची कमी उपलब्धता, बालकांचे योग्य प्रकारे संगोपन न करणे, स्वच्छतेची किंवा आरोग्यविषयक कमतरता आणि रोगांचे वाढते प्रमाण यामुळे बालमृत्यूदर अधिक आहे. मात्र, बाल मृत्यु दरात घट होत आहे.

4. मानवी विकासाचे प्रमाण कमी :

जगातील उच्च मानव विकास असलेल्या देशांच्या म्हणजे विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशातील मानव विकास कमी आहे. मानव विकास अहवाल 2020 नुसार 2019 मध्ये विकसनशील देशांच्या बाबतीतील मानव विकास निर्देशांक (HDI) मूल्य 0.699 होते आणि ते अति उच्च मानव विकास असलेल्या देशांच्या (0.898) आणि जगाच्या (0.737) तुलनेत कमी होते. याचे कारण मानव विकास ज्या आधारावर निश्चित केला जातो त्या

घटकांच्या म्हणजेच दरडोई उत्पन्न, आयुमर्यादा इत्यादी बाबतीतील विकसनशील देशातील स्थिती समाधानकारक नाही हे आहे.

5. आयुमर्यादा कमी:

आयुमर्यादा कमी हे विकसनशील देशांच्या बाबतीतील लोकसंख्याविषयक वैशिष्ट्य आहे. व्यक्ती जन्मानंतर सरासरी किती वर्षे जगू शकते याचा आयुमर्यादा असे म्हणतात. विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशातील आयुर्मर्यादा कमी आहे. विकसनशील देशात आहाराची उपलब्धता, आरोग्यविषयक सेवा सुविधांची उपलब्धता, समाजात स्त्रियांना मिळणारे स्थान इत्यादी बाबतीतील स्थिती समाधानकारक नसल्याने आयुमर्यादा कमी आहे. मानव विकास अहवाल 2020 नुसार 2019 मध्ये विकसनशील देशातील आयुर्मर्यादा 71.3 वर्ष होती आणि ती अति उच्च मानव विकास असलेल्या देशांच्या (71.3 वर्षे) आणि जगाच्या (79.6 वर्षे) तुलनेत कमी होती.

6. अपुरे पोषण व आहारातील कमतरता :

विकसनशील देशात उच्च लोकसंख्या वृद्धीदर आणि लोकसंख्येचा मोठा आकार यामुळे दरडोई उत्पन्न कमी असते. तसेच लोकसंख्येच्या तुलनेत उत्पादन कमी असते. अन्नधान्य आणि आहारातील इतर बाबींची उपलब्धता कमी असते. अशा देशात दारिद्र्याचे प्रमाण मोठे असते. यामुळे अशा देशातील फार मोठ्या लोकसंख्येचे पोषण योग्य प्रकारे होत नाही.

7. कृषी लोकसंख्येची उच्च घनता :

अनेक विकसनशील देशात कृषी लोकसंख्येची घनता उच्च आहे. अशा देशात लोक लागवडीखालील जमिनीच्या तुलनेत शेतीतील लोकसंख्या फार जास्त आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात लोकसंख्येची दाटी झाली आहे. त्याचा शेतीच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

8. तरुण लोकसंख्येचे प्रमाण अधिक:

विकसनशील देशात एकूण लोकसंख्येत तरुण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. अशा देशात जननदर मोठा आहे आणि मृत्यु दरात घट होत आहे. तसेच बालमृत्यू दरातही घट होत आहे. त्यामुळे तरुणांच्या लोकसंख्येतील प्रमाण वाढत आहे.

9. लोकसंख्येची गुणवत्ता कमी :

विकसनशील देशात विकसित देशांच्या तुलनेत लोकसंख्येचे गुणवत्ता कमी आहे. लोकसंख्येची गुणवत्ताही आयुमर्यादा साक्षरतेचे प्रमाण इत्यादी बाबींवर अवलंबून असते. या बाबतीतील स्थिती विकसनशील देशात असमाधानकारक असल्याने लोकसंख्येची गुणवत्ता कमी आहे.

### 2.3.3 विकसनशील देशाची तंत्रज्ञानविषयक वैशिष्ट्ये

आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञान हा महत्त्वाचा घटक आहे. अलीकडील काळातील देशाचा आर्थिक विकास हा मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. विकसनशील देशात अलीकडील काळात तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. मात्र, विकसित देशांशी तुलना करता विकसनशील देशातील तंत्रज्ञानविषयक प्रगती मर्यादित आहे. विकसनशील देशांची तंत्रज्ञानविषयक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

1. आधुनिक तंत्रज्ञानाचा मर्यादीत वापर :

विकसनशील देशात काही देश क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असला तरी तो विकसित देशांशी तुलना करता कमी आहे. अनेक विकसनशील देशात तंत्रज्ञानविषयक प्रगती अतिशय कमी असल्याने आधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाचा फारसा अवलंब केला जात नाही. अनेक विकसित देशात अजूनही जुनाट व कालबाह्य तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे.

2. श्रमप्रधान तंत्राचा अवलंब :

आधुनिक तंत्रज्ञान हे खर्चिक आणि भांडवलप्रधान असते. विकसनशील देशात भांडवलाची कमतरता असते आणि श्रमाची उपलब्धता अधिक असते. त्यामुळे त्या देशात श्रमप्रधान तंत्राचा अधिक प्रमाणात अवलंब केला जातो. उत्पादनाच्या प्रमाणात जेव्हा वापर वाढ केली जाते तेव्हा श्रमप्रधान तंत्र भांडवलप्रधान तंत्रापेक्षा खर्चिक ठरते. त्यामुळे विकसित देशांना जसे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळतात तसे ते विकसनशील देशांना मिळत नाही.

3. श्रमाची कमी उत्पादकता :

विकसनशील देशात अनेक क्षेत्रात व विशेषतः शेती क्षेत्रात परंपरागत व जुनाट तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याने या क्षेत्रातील श्रमिकांची उत्पादकता कमी असते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात नसल्याने उत्पादनाचा खर्च जास्त आहे.

4. तंत्रज्ञानविषयक प्रगती मर्यादित:

तंत्रज्ञान क्षेत्रात अल्प प्रमाणात गुंतवणूक, संशोधन व विकासावर भर कमी, तंत्रज्ञान विकासासाठी आवश्यक सुविधांची कमतरता इत्यादीमुळे विकसनशील देशात तंत्रज्ञानविषयक प्रगती मर्यादीत आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला मर्यादा पडलेल्या आहेत

5. तंत्रज्ञानाची मर्यादित उपलब्धता :

जगात शेती, उद्योग, वाहतूक, दळणवळण, बँक, व्यवसाय इत्यादी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. मात्र, विकसनशील देशात तंत्रज्ञान उपलब्ध होण्यात अडचणी आहेत. विकसनशील देशांना आधुनिक तंत्रज्ञानासाठी विकसित देशावर अवलंबून रहावे लागते. तंत्रज्ञान विदेशातून आयात करावे लागते. मात्र, कमी किमतीत व देशातील परिस्थितीत उपयुक्त तंत्रज्ञान उपलब्ध होईलच याची खात्री नसते.

2.3.4 विकसनशील देशांची सामाजिक वैशिष्ट्ये :

विकसनशील देशात यातील सामाजिक स्थितीत अलीकडील काळात सुधारणा होत असली तरी ती विकासाला पूर्णपणे अनुकूल नाही. विकसनशील देशात सामाजिक स्थिती स्पष्ट करणारी या देशाची सामाजिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

1. संयुक्त कुटुंब पद्धती :

संयुक्त कुटुंब पद्धती जी आता मागे पडत चालली असली तरी ती अजूनही कमी जास्त प्रमाणात विकसनशील देशात अस्तित्वात आहे. संयुक्त कुटुंबात सर्वांना प्रगतीची संधी मिळत नाही. तसेच अशा कुटुंबात काही सदस्य काम न करताही राहत असतात. अनेकदा अशा काम न करणाऱ्यांना अधिक प्रतिष्ठा मिळते. त्यामुळे अनेकांच्या काम करण्याच्या प्रेरणेने खच्चीकरण होते.

2. जातीव्यवस्था :

अनेक विकसनशील देशात जातीय व्यवस्था अस्तित्वात असून तिने व्यवसायिक व भौगोलिक गतिशीलता मर्यादित केली आहे. तेथील अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्या जातीवर आधारलेली व्यवसायावर कार्यरत आहेत.

3. स्त्रियांचा दर्जा व दुय्यम स्थिती :

विकसनशील देशात स्त्री-पुरूष समानता आढळत नाही. समाजातील स्त्रियांचा दर्जा व स्थान पुरुषांच्या तुलनेत दुय्यम आहे. स्त्रियांविषयी या समाजाचा सदोष दृष्टिकोन व प्रथा त्यांच्या प्रगतीची प्रगतीच्या आड येतात देशाच्या विकासात त्यांना क्षमता असूनही योग्य ते योगदान देता येत नाही.

4. समाजाचे वर्तन परंपरगत निश्चित:

विकसनशील देशातील बहुजन समाजाचे आणि सामान्य जनतेचे वर्तन हे रुढी परंपरेने निश्चित होते. अशा देशात रूढी व परंपरेचे प्राबल्य असते. रूढी, परंपरांना अनुसरून सण, उत्सव साजरे केले जातात. अशा समाजात आधुनिक विचार सहसा रुजत नाही.

5. कौटुंबिक दृष्टिकोनाचा प्रभाव :

कुटुंब हे प्राथमिक, आर्थिक व सामाजिक एकता हे विकसनशील देशात कुटुंबाच्या आयोग्य दृष्टिकोनामुळे लोकसंख्यावाढीची समस्या निर्माण झालेली आहे. शेत जमिनी विषयी वाटणारा जिव्हाळा हाही एक दृष्टिकोनाचा भाग आहे. व्यक्तिस्वातंत्र्याला कुटुंबाच्या दृष्टिकोनामुळे मर्यादा पडतात.

2.3.5 विकसनशील देशांची राजकीय वैशिष्ट्ये:

विकसनशील देशांची राजकीय वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

1. राजकीय अस्थिरता :

अनेक विकसनशील देशातील सरकारी स्थिर नाहीत किंवा ती वारंवार बदलतात. नवीन सरकार सत्तेवर आल्यावर नवीन नियम व कायदे करते आणि धोरणात बदल करते. त्यामुळे धोरणात सातत्य राहत नाही. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी देशात राजकीय स्थैर्याची गरज असते. निवडणुका किंवा हुकूमशाही सरकार यामुळे सरकार बदलू शकते. पराजित राजकीय पक्ष आणि सत्ता मिळवू न शकलेल्या श्रीमंत सरकार विरोधी कारवायांना मदत करतात. त्यामुळे राजकीय अस्थैर्य निर्माण होते.

2. अकार्यक्षम प्रशासन :

विकसनशील देशातील प्रशासन भ्रष्टाचारी व अकार्यक्षम आहे. सरकारचे प्रशासन वर पूर्ण नियंत्रण नसते. सरकारने केलेले कायदे, मंजूर केलेल्या योजना व विकास प्रकल्प इत्यादींची अंमलबजावणी प्रशासनाकडून होते. तसेच योग्य योजना अखण्याच्या कार्यातही प्रशासनाचा महत्त्वाचा आहे. मात्र, प्रशासन अकार्यक्षम असल्याने आणि प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी भ्रष्टाचारी असल्याने येथील सरकारने केलेले कायदे, मंजूर केलेल्या योजना व विकास प्रकल्प इत्यादींची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही.

3. भक्कम व जबाबदारी विरोधी पक्षाचा अभाव :

जगातील अनेक विकसनशील देशात लोकशाही आहे. लोकशाहीत विरोधी पक्षाचे स्थान महत्त्वाचे आहे. मात्र, अनेक विकसनशील देशात भक्कम विरोधी पक्ष अस्तित्वात नाही. त्यामुळे तेथील सरकारला योग्य निर्णय घेण्यापासून रोखण्यास मर्यादा पडतात. अनेकदा विरोधी पक्षाची भूमिका विरोधासाठी विरोध करण्याची असल्याचे दिसून येते.

4. सरकार आणि विरोधी पक्षात एकमताचा अभाव :

विकसनशील देशांमध्ये विरोधी पक्षाकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन योग्य नाही. लोकशाही प्रक्रियेचा एक भाग म्हणून सरकार विरोधकांचा विचार करत नाही. तेथील सरकारी त्यांना राज्याच्या प्रगती व समृद्धीच्या मार्गातील अडथळा मानतात. विकसनशील

देशांमध्ये सहसा कोणत्याही राजकीय विषयावर सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यात एकमत दिसून येत नाही.

5. निर्णय प्रक्रियेत हितसंबंधी गटांचे भूमिका :

विकसनशील देशातील राजकीय पक्षात हितसंबंधी गटाचे किंवा कंपनीचे वर्चस्व असते. या पक्षाकडे कार्यकारी संस्था असतात. मात्र, त्यांच्या बैठका प्रतिकात्मक असतात. पक्षाच्या छायेत हितसंबंधी गट किंवा कंपू त्यांच्या स्वतःच्या हिताला प्राधान्य देतात. विकसनशील देशांमध्ये वैयक्तिक हितसंबंधी गट किंवा कंपू निर्णय प्रक्रियेचा प्रमुख घटक बनण्याची शक्यता असते.

2.4 भारत एक उद्योन्मुख अर्थव्यवस्था :

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था मागासलेली होती. दारिद्य, बेकारी, आर्थिक मागासलेपणा अशा अनेक समस्या भारतापुढे होत्या. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात देशात नियोजनाचा अवलंब करुन आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंत बारा पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेची वेगाने प्रगती होण्यासाठी 1991 पासून देशात आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविला जात आहे. शिथिलीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण यावर नवीन आर्थिक धोरणात बदल दिलेला आहे. भारतातील आर्थिक सुधारणांमुळे आर्थिक विकासाला वेग येण्यास मदत झाली आहे. वेगाने विकास साध्य करणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था ओळखली जात आहे. जगातील काही उद्योजक बुक अवस्थेत भारतीय अर्थव्यवस्थेचा समावेश आहे. एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून असलेली भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील-

1. राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात वाढ:

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात वेगाने वाढ होत आहे. भारतात लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असताना उत्पन्नात झालेली वाढ अधिक महत्त्वाचे आहे. भारताची आर्थिक पाहणी 2020-21 नुसार 1950-51 मध्ये चालू किमतीला देशाचे निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न 9,829 कोटी रुपये आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न 274 रुपये होते.1990-91 मध्ये चालू किमतीला निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न 5,26,017 कोटी रुपये आणि 2019-20 मध्ये 1,79,99,754 कोटी रुपये होते. 1990-91 मध्ये चालू किमतीला दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न 6,270 रुपये आणि 2019-20 मध्ये 1,34,226 रुपये होते. याचाच अर्थ देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वेगाने वाढ झालेली आहे.

2. उच्च वृद्धी दर:

गेल्या काही वर्षात व विशेषत: आर्थिक सुधारणोत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्थेची वेगाने वृद्धि घडून येत आहे. 1998 मध्ये भारताने जगातील सर्वात उच्च वृद्धीदरापैकी असा एक वृद्धीदर साध्य केला. 2017-18 मध्ये भारताने 7 टक्के वृद्धी दर साध्य केला आहे. थोडक्यात अलीकडील काळात वृद्धीच्या बाबतीत अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली आहे. वेगाने प्रगती करणारी अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्था उदयास येत आहे.

3. शेतीवरील अवलंबित्व कमी :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा किंवा प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी होऊन द्वितीय आणि प्रत्येक क्षेत्राचा वाटा वाढत जाणे अपेक्षित असते. अलीकडील काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे शेतीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणावर कमी होत आहे. 1950-51 मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनातील 53.1 टक्के होता तर 2018-19 मध्ये तो 14.4 टक्क्यापर्यंत कमी झाला आहे. भारतीय देशांतर्गत उत्पादनाच्या क्षेत्रीय विभागाणीत झालेला हा महत्त्वपूर्ण बदल भारतीय अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करीत असल्याचे स्पष्ट करतो. दुसरे असे की शेतीच्या बाबतीत अतिशय अल्प वृद्धीदर अनुभवास येऊनही अर्थव्यवस्थेने मोठा वृद्धीदर गाठलेला आहे. याचाच अर्थ शेती क्षेत्राच्या पुरेशा योगदानाचा अभाव असतानाही अर्थव्यवस्थेची वेगाने वृद्धि घडून येत आहे.

4. उद्योग व सेवा क्षेत्राची वेगाने वृद्धी:

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राच्या प्रगतीला मर्यादा पडत असताना उद्योग व सेवा क्षेत्राची वेगाने वृद्धि घडून येत आहे. त्यामुळे त्यांचा देशांतर्गत उत्पन्नातील वाटा वेगाने वाढत आहे. 2017 मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनातील उद्योगाचा वाटा भारतात 23.0 टक्के होता आणि युनायटेड स्टेट 19.1, युनायटेड किंगडम 22.2 अशा प्रगत देशापेक्षा जास्त होता. याचाच अर्थ उद्योग क्षेत्र देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. देशात मूलभूत भांडवली वस्तू उद्योगांची वेगाने वाढ होत आहे. उद्योग क्षेत्राबरोबरच सेवा क्षेत्राची वाढ ही वेगाने होत आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान देणारे क्षेत्र म्हणून सेवा क्षेत्र पुढे येत आहे. 2017 मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनातील सेवा क्षेत्राचा वाटा 61.5 टक्के होता. अशा प्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत रचनात्मक बदल होत असून ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या क्षेत्रावर विभागणीत उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा मोठा असल्याचे स्पष्ट करतात.

5. बचत व भांडवलनिर्मितीत वाढ :

आर्थिक विकासासाठी भांडवल निर्मितीत वाढ होणे आवश्यक आहे. बचतीत वाढ झाली असता त्यातून भांडवल निर्मितीसाठी अधिक पैसा उपलब्ध होतो. नियोजन काळात आणि

विशेषता आर्थिक सुधारणा काळात बचत आणि भांडवल निर्मितीच्या दरात वाढ झाली आहे. 1950-51 मध्ये बचतीचा दर म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादनाची असलेले शेकडा प्रमाण 9.5 होते तर 1990-91 मध्ये 22.9 आणि 2017 मध्ये 30.5 होते. भांडवल निर्मितीचा दर म्हणजे चालू स्थूल देशांतर्गत उत्पादनाची असणारी शेकडा प्रमाण 1950-51 मध्ये 9.3 होते तर 1990-91 मध्ये 26.0 आणि 22017-18 मध्ये 32.3 होते याचा अर्थ देशातील बचत आणि भांडवल निर्मितीच्या दरात वेगाने वाढ झालेली आहे. वेगाने आर्थिक विकास साध्य करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे.

6. बँक व्यवसाय आणि वित्तीय क्षेत्रात प्रगती :

नियोजन काळात देशातील बँक व्यवसाय आणि वित्तीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका देशातील विविध आर्थिक क्षेत्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. भांडवल बाजाराच्या विकासाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे भांडवल बाजाराचा विकास होत आहे. त्यामुळे देशातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला मोठ्या प्रमाणात हातभार लागत आहे.

7. परकीय गुंतवणुकीत वाढ :

परकीय भांडवलाबाबतच्या पूर्वीच्या दृष्टिकोनात फार मोठ्या प्रमाणात बदल होऊन नवीन धोरणात परकीय भांडवल याबाबतचा दृष्टिकोन करण्यात आला. परकीय भांडवलासाठी अधिकाधिक क्षेत्रे खुली करण्यात आली. त्यामुळे देशातील परकीय गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. 1991-92 नंतरच्या काळात भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीत आणि रोखारूपी गुंतवणुकीत वाढ झाली आहे. 1991-92 मध्ये परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक 129 दशलक्ष अमेरिकन डॉलर होती हे तर 2006-07 मध्ये निव्वळ प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक 8.5 बिलियन अमेरिकन डॉलर एवढी होती. 1991-92 मध्ये देशात चार दशलक्ष अमेरिकन डॉलरची रोखारुपी गुंतवणूक करण्यात आली तर 2013-14 मध्ये भारतातील निव्वळ रोखारुपी गुंतवणूक 4,822 दशलक्ष यु.एस. डॉलर एवढी होती. 2018-19 मध्ये परकीय प्रत्यक्ष (थेट) गुंतवणूक 38,744 दशलक्ष यु.एस. डॉलर आणि 2018-19 मध्ये परकीय प्रत्यक्ष (थेट) गुंतवणूक 38,744 दशलक्ष यू.एस. डॉलर होती परकीय गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने देशात गुंतवणुकीत वाढ होण्यास मदत झालेली आहे.

8. इतर वैशिष्ट्ये :

एक उद्योन्मुख अर्थव्यवस्था म्हणून असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या वरील वैशिष्ट्यंव्यतिरिक्त इतरही काही वैशिष्ट्ये आहेत. एकूण लोकसंख्येतील तरुण लोकसंख्येचे प्रमाण मोठे, विस्तृत बाजारपेठ, नवीन तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगती, परकीय गुंतवणूकदारांची

गुंतवणूक यासाठी भारतात पसंती ही इतर काही वैशिष्ट्ये आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेची वरील वैशिष्ट्ये भारतीय अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करीत असल्याचे आणि ती एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था असल्याचे स्पष्ट करतात.

## संदर्भ ग्रंथ:-

1) अर्थशास्त्र परिभाषा कोश (1997), भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
2) भारतीय अर्थव्यवस्था, किरण देसले, भगीरथ प्रकाशन, तृतीय आवृत्ती, जळगाव.
3) Human Development Report, 2020
4) India Development Report, 2002
5) Reserve Bank of India,Annual Report 2019-20
6) Report Development Report, 2015

**-----XX-o-XX-----**